# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २८/१०/२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २८/१०/२०१६ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. २४/१०/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हरिश्चंद्र आंमगावकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | मा. सभापती |
| २. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| ३. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ४. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ५. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ६. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| ७. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |
| ८. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ९. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| १०. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ११. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १२. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १३. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १४. | ॲड रवि व्यास | सदस्य |

गैरहजर सदस्य –

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| २. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |

मा. सभापती :-

सर्व सन्मा. सदस्यांना दिवाळीच्या शुभेच्छा. जे सदस्य निवृत्त होतात त्यांनी मला सभापती म्हणून जे सहकार्य केले त्या सर्व सदस्यांचे आभार मानतो. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचीमा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २८/१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचनाक्र. ०८, दि. २४/१०/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ७३, दि. १५/०७/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

शरद पाटील :-

भारतीय जनता पक्षातर्फे सर्व अधिकाऱ्यांना व सदस्यांना दिवाळीच्या आणि नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. ही दिवाळी समृध्दीची व भरभराटीची जावी अशा शुभेच्छा देतो.

सुहास रकवी :-

भारतीय कॉंग्रेस पार्टीतर्फे सर्व अधिकाऱ्यांना सदस्य, सभापती व मान्यवरांना दिवाळीच्या शुभेच्छा. आमच्या पक्षातर्फे ही दिवाळी तुम्हाला सुखसमृध्दीची व भरभराटीची जावो अशी सदिच्छा देतो.

जयंतीलाल पाटील :-

शिवसेना पक्षाकडून आयुक्त साहेब, सभापती महोदय, अधिकाऱ्यांना दिवाळीच्या लाख लाख शुभेच्छा.

राजू भोईर :-

बहुजन विकास आघाडीतर्फे सर्व अधिकारी, नगरसेवक, मा. सभापतींना शुभेच्छा देतो.

नरेंश पाटील :-

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे सर्व अधिकारी, आयुक्त सर्व स्टाफ, नगरसेवक, नगरसेविका यांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा. नविन वर्ष सर्वांना सुखसमृध्दीचे भरभराटीचे जावो.

मा. उपायुक्त (मु.) :-

मा. सभापती महोदय, सर्व सन्मा. सदस्य, उपस्थित अधिकारी वर्गाला प्रशासनाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा.

प्रशांत केळुसकर :-

आजची स्थायी समिती सभा काही अपरिहार्य कारणामुळे तहकूब करण्यात येत आहे.

रवि व्यास :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वांनुमते मंजूर.

सभा तहकूबी ठराव क्र. ७० :-

आजची स्थायी समिती सभा तहकूब करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदन :- श्री. रवि व्यास

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

सभा संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दु. १२:३५ वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका